# प्रभु तरुण

| वर्ष ५५ | अंक ०९ | मुंबई | १६ मे, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## आला, वसंत आला...

—सुहासिनी कीर्तिकर

'आल्या वसंत गौरी
सांगे फुलास वारा
वाऱ्यास गंध येतो
म्हणती ढगास तारा'

- कविवर्य ग. दि. माडगूळकरांनी केलेला हा वसंत ऋतूतील सृष्टिसंवाद आहे. वसंत ऋतू म्हणजे अनेक वेगळ्या वेगळ्या गोष्टींची जंत्री. गेल्या महिन्यात गुढीपाडवा झाला. म्हणजे हिंदू नववर्षाची सुरुवात झाली. द. भा. धामणस्कर म्हणत जरी असले की 'मी पंचांगाला चैत्र कधी, हे विचारलेच नाही. झाडांची पोपटी पालवी मला अधिक विश्वासार्ह वाटली!' तरी आपण सर्वसाधारण माणसे पंचांगाला 'विचारतो' आणि पंचेंद्रियांनी सर्व सणांचा आस्वाद घेतो. उत्सव साजरा करतो. या परंपरा पालनात मनाला चैतन्याचे वारे घेरून टाकते, आनंदाची देवाणघेवाण होते. या वर्षी तर 'लॉकडाऊन'च्या कालखंडानंतर जवळजवळ दोन वर्षांनी नववर्षाभिनंदनानिमित्त पाडव्याला शोभायात्रा निघाल्या. सुनसान रस्ते रांगोळ्यांनी बहरले, सजले. मराठी पारंपरिक पोशाखातील सळसळता उत्साह, उभारलेल्या गुढ्या त्यांनी मनात उरलेली, उतरलेली चिंतेची काजळी सारवली गेली अन् माणूस पुन्हा सावरला! (सॉलि. राजन जयकर यांनी उभारलेल्या गुढीबरोबर आपला फोटो व्हॉटस्अॅपवर टाकताना गंमतीने 'चर्चगेटचा राजा' असेही म्हटले!) गुढीपाडव्याचा हात धरून आली रामनवमी. मी सध्या हैदराबादला असल्याने फार वेगळे अन् आनंददायी संस्कृतीदर्शन झाले मला. आपल्या दिवाळी सणापेक्षाही इथे चैत्रोत्सव महत्त्वाचा आणि आनंदाचा असतो. नवरात्रातल्या अष्टमीला आपण कुमारिकापूजन करतो त्याप्रमाणे इथे चैत्रातल्या अष्टमीला कुमारिका पूजतात. पण गंमत पहा; शाळांचे नवीन वर्ष सुरू झालेले. नवीन वर्ग, नवीन शिक्षक, नवीन सोबती आणि पुढील वर्षाचा अभ्यासक्रम सुरू. म्हणजे या साजऱ्या दिवसांत शाळेला दांडी मारता येत नाही. मुले दुपारी एकदीडला घरी परतणार. अष्टमीच्या दिवशी कुमारीकांना मागणीचा धडाका. तरीही उत्साह तुडुंब वाहणारा. मुली घरी येणार. गणवेश बदलणार. मग नव्याने वेणीफणी करून, सुंदरशा परकर चोळ्या घालून, फुले माळून कुणाकुणाकडे निमंत्रित म्हणून जाणार. त्यांना श्रीखंडपुरी, छोले, खाता खाता तृप्तीचा ढेकर देणार. शिवाय काय काय भेटवस्तू! आपल्याकडे चैत्रातले हळदीकुंकू असते. भिजवलेले चणे मिळतात. पन्हे, अंबाडाळ असते जीभेचे चोचले पुरवणारी. पण ते सर्व बायकांसाठी असते चवदार सगळे. या अष्टमीसोबत लगबगीने येते रामनवमी. चैत्रात नवी पालवी फुटते तशी फुटलेली ही सणांची पालवी. मनाला पालवणारी. रामनवमी पाठोपाठ हनुमानजयंती आपल्या जोगेश्वरी देवीसमोर असणाऱ्या दीपमाळा उजळून आपली मनेही उजळून गेली. सध्या हनुमान, राम या देवतांना राष्ट्रीय प्रतिमांचे राजकीय वलयही प्राप्त झाले आहे. त्यामुळे अजून अयोध्येत राममंदिराची उभारणी पूर्ण झाली नाही; तरी लक्षलक्ष दिव्यांनी ती जागा झळाळून उठली. रांगोळ्या, हजारो पणत्या, उत्साह, भक्ती यांना आलेल्या उधाणाला सीमाच नव्हती.

हे उधाण शिळ्या कढीला उधाण आणणारेही ठरतेय; याची मित्रांनो खंत आहे मनात. निधर्मी किंवा सर्वधर्मसमभावीय अशा आपल्या भारतात हिंदू सण साजरे व्हावेत; यात काहीच सलत नाही. आनंद वाढतोच त्यामुळे. पण त्याच मोसमात रमझान येतो. इफ्तार पार्ट्या झाल्या. वसंत फुलताना असा विचार कधीच करत नाही की ''आता हा कांचन आहे. त्याचा रंग जांभळा. मग हा बहावा आहे. त्याचा रंग पिवळा. मग त्या सोबतीने गुलमोहराचा लाल रंग कशाला हवा? मोगरा तर पांढऱ्या फुलांनी बहरून जातोय. त्याचे 'पांढरे निशाण' कशाला हवं? त्या जोडीने मदनबाण, जाई, जुईही या पांढऱ्या रंगात सुगंधित होतायत. त्यांना टाका उपटून. नाहीतर जाळून. बहिणाबाई कशाला बरे म्हणाल्या, 'टाया वाजविती पानं, दंग देवाच्या भजनी?' खरेच ना मित्रांनो, वसंत फुलतो तो रानी, वनी, मनी. तो फक्त बहिणाबाईंच्या शब्दात म्हणतो, 'होऊ दे रे आबादानी'. या निसर्गाला साथ देत येतात आपले सणवार. म्हणून चैत्रोत्सव येतो. हनुमान जयंतीच्या सोबतीने येतो रमझान. त्याच्या हातात हात घालून येते आंबेडकर जयंती. येते शिवजयंती. पाठोपाठ येतो ख्रिश्चन बांधवांचा 'इस्टर' सण... असे कितीतरी उत्सव मनाला सतत उभारी धरण्याचे धडे देत असतात. ही उभारी धरायची म्हणून तर गुढी उभारली जाते.

मग सामाजिक उत्सवही साजरे होतात. कुठे कुठे वसंत व्याख्यानमाला गाजत असते. उन्हाची काहिली असली तरी कुठे कुठे सहली निघतातच. कुठे एखादा गाण्याचा कार्यक्रम; तर कुठे एखादे कीर्तन. अलीकडे कीर्तने तशी तुरळकच. पण अजूनही त्यांना प्रतिसाद आहे. एकेकाळी चातुर्मासातली कीर्तने म्हणजे पर्वणी असायची. ते टिळा लावलेले बुवा, टाळचिपळ्यांची साथ, मृदुंगाचा ठेका, कथा आणि उपदेश यांनी रंगलेला तो देवळातला सोहळा... फार मोठे संस्कार करून जायचा.

तसे संस्कार सार्वजनिक स्वरूपात आताशा कमी झालेत. आता कीर्तन ऐकायचे तर टी.व्ही.च्या पडद्यावर. म्हणजे पहायचे नाही; तर ऐकायचे. त्यात थेट संवादाची गंमत नाही. आतून फुलून येणे नाही. 'ते हि नो दिवसा गत:।'!!

तसं तर चैत्र वैशाखातील बेगमीची कामं तरी आताशा कुठे असतात? कर्ते-करविते हात इतर कामात, जबाबदाऱ्यात गुंतलेले; घरे लहान. तंत्र इतके पुढारलेले की काहीही घरबसल्या मागवता येते. साठवण नाही करायची हा आजच्या जगण्याचा मंत्र. दोन तीन अशा खाणाऱ्या तोंडांना जुनी चव फक्त आठवणीतच ठेवायची अन् झटपट होणाऱ्या आधुनिक गोष्टी शिजवून भूक भागवायचे पडलेले नवीन वळण... अशा अनेकानेक कारणांनी आता साठवण होत नाही. पण एक काळ असा होता की होळी झाली रे की वर्षभर लागणाऱ्या गोष्टींचा साठा करायला गृहिणींची लगबग असायची. हळद, मिरी, परभी सांबार, डाळ, तांदूळ, खडे मीठ, कांद्यांच्या माळा, गोडे तेल, फेण्या, पापड, लोणची, शेवया, आंबोशी, सुका बाजार, सांडगे... अशा गोष्टींनी हा ऋतू नुसता बहरून जायचा. त्यातच पॉटच्या आईसक्रीमचा बेत असायचा. आंब्यांनी एक पूर्ण खोलीच घमघमती असायची. चिंचेचे गोळे, कोकम भरलं जायचं. खिम्याच्या पावांनी वा कवटांनी सुट्टी वासंतिक व्हायची. ही चंगळ कदाचित् आज घरोघरी नसेल; पण आजही वसंत फुलतोच. ऋतू बहरतोच. निसर्ग लयलूट करतोच. आपले मनही पाडगावकरांच्या शब्दांत सांगायचे तर 'सांगा कसे जगायचे? कण्हत कण्हत की गाणं म्हणत?' या प्रश्नाला 'गाणं म्हणत' असेच उत्तर देते. आता पाडगांवकर आठवले तसे सहज शिरीष पै ही आठवल्या - त्या एका कवितेत म्हणतात ना की

'हिंडताना रस्त्यावर
फुले भेटली अनंत
आणि देतो आलिंगन
स्पर्शावाचून वसंत.'

मंडळी, हा कामदेवाचा पुत्र असणारा वसंत, कुसुमाकर वसंत, रसनेला रसपाझर फोडणारा वसंत, 'ज्ञानेश्वरी'तला 'माधवी' असा उल्लेख असणारा वसंत, 'वसंत ये रानीवनी, हासली लताफुले!'...

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

असा हर्षोत्फुल्ल वसंत, सणांनी सजलेला वसंत... असा वसंत साधुसंतांना देखील खुणावतो, लोभावतो. कामदेवाला आमंत्रण देतो.

मंडळी, असा हसरा, नाचरा, आनंद देणारा वसंत ऋतू तुमच्या जीवनात असाच पालवत राहो. वसंतातले कूजन कधी न सरो. मनाच्या कुपीत आनंद शिगोशीग भरो. वसंत हा जीवलग सततच तुमच्यासोबत राहो. जसा 'प्रभुतरुण' तुमचा सतत सोबती आहे अगदी तस्साच.

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा १०७ वा वार्षिक बक्षीस समारंभ दिनांक २७ मार्च २०२२ रोजी डॉक्टर ज्योती तळपदे-सोनेजी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यांच्या हस्ते नऊ मान्यवर भगिनींना रौप्य पदक व एका भगिनीला स्मृतिचिन्हानी सन्मानित करण्यात आले. याशिवाय शैक्षणिक पुरस्कार विद्यार्थिनींना देण्यात आले. माननीय अध्यक्ष यांनी आपल्या भाषणामध्ये महिला समाजाचे कौतुक करून वैद्यकीय शिबिरे घेण्यात यावी असे सुचविले.

महिला समाजाच्या अध्यक्ष साया नवलकर आणि विश्वस्त वृंदा जयकर यांचा समाजात साठ वर्षे कार्य केल्याबद्दल सत्कार केला गेला. तसेच वकृत्व स्पर्धेत विजयी झालेल्या महिलांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी उपस्थितांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

सालाबादाप्रमाणे पाठारे प्रभु महिला समाजाचे चैत्रगौरी हळदीकुंकू २४/४/२२ रोजी नेहमीच्या उत्साहात साजरे झाले. दरवर्षीप्रमाणे गौरीची अप्रतिम आरास झाल्यावर कार्यकारी भगिनींनी देवीची आरती केली. नंतर अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच मोठ्या भगिनींसाठी मराठी, हिंदी वकृत्व स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा कलात्मक. स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धा घेतल्या.

त्यात यशस्वी भगिनींची नावे:

✶ *फॅन्सी ड्रेस स्पर्धा (१५ वर्षाखालील मुली)*

प्रथम क्रमांक -अनंदिता विद्याधर आगासकर, दुसरा क्रमांक-अनिका निहाल कोठारे

✶ *फॅन्सी ड्रेस स्पर्धा (१५ वर्षावरील महिला)*

प्रथम क्रमांक- स्वप्ना विनित जयकर, दुसरा क्रमांक विभागून सौ. मीना धराधर-आंबवणे, डॉ. अर्चना निहाल कोठारे.

✶ *मराठी वकृत्वस्पर्धा (महिलांसाठी) माझे शेजारी*

(पान ६ कॉलम २ वर)

# ``WORDPLAY"

**-Armaan Kothare**

## GHOSTLY SPITE

1. **The Shoemaker**

In a small town, one shoemaker was walking back home to his little hut on the outskirts of the area. It had been a long, sad day, for the shoemaker had received just a handful of customers, barely making him enough to buy some breadsticks the next day. Tired, he trudged back home, freshened up, and starting pouring out his soup, which was the only supper he could afford.

It was twelve minutes past midnight; normally, the very thought of staying awake would be enough for the person to bail on the idea, but not this man. After years of staying alone and being up till late at night, nothing fazed the shoemaker anymore. Not the sleep, and nor did the rumours about the monsters that lurked at night.

According to the rumours, there was once a trader who was denied refuge due to his appearance during his short visit to the town. He died of starvation in the woods, and now his ghost would return to haunt the town.

It's been two years since that rumour first started...no such ghost was ever reported. However, since some people spread lies about witnessing some paranormal presence, the villagers still believed he was on the prowl. But of course, the shoemaker didn't believe this, for *he* was the one who had sent the man away due to his ego. Business was great at the time, and he thought very fondly of himself, so much so that he refused to help someone with torn clothes and a mud-stained face. He refused to help the man and told him to go back to his dirty dwelling.

This fateful night however, even the shoemaker felt particularly off; it was something with the air, it felt...colder. And why wouldn't it, for just across the door of his hut stood the pale blue ghost of the vengeful trader, glaring at the shoemaker through the window.

The shoemaker started to head towards his kitchen, and just as he looked outside the window, he saw the same man who had been found dead two years ago, standing across the road, his gaze fixed upon him.

He couldn't believe his eyes at first, but when he caught up with reality, a burst of adrenaline shot through his body as he rushed to lock the front door. Alas, ghosts don't fancy doors.

The ghost phased through the door, pushed back the startled man, and in the process, ended up destroying the door. This noise was enough to wake the young lady who lived down the lane.

The ghost dragged the shoemaker out of his house, inching closer to the woods. The ghost turned red and tightened his cold, piercing hold onto the man's wrist, urging him to look into his eyes.

"LOOK INTO MY EYES! LOOK INTO THEM! LET ME BECOME ONE WITH YOU! TOGETHER WE'LL BE SO STRONG. ALL IT TAKES IS ONE GLANCE" the ghost's raspy voice chanted, but the shoemaker was smart enough to know not to follow the strange being.

The ghost stopped chanting after some time. It's grip lightened, and soon the man felt free, slumped onto the floor of the cold woods. After waiting some more time, he opened his eyes, only to face the red eyes of the ghost staring right into his soul. He could feel the life sap out of his body, and he helplessly held his gaze, slowly losing his soul.

A few seconds later he slumped back onto the forest bedding, only this time, he was dead.

2. **The Lady**

The lady had seen the act, and was left horrified beyond words. She didn't make a sound, and slowly took a step back. The only problem was, she stepped onto dry leaves of the fall that had just been shed off last week, making a swift and crisp "crunch" sound.

This was enough to alert the ghost. Nobody could live to confirm his existence, for sooner or later they'd know how to counter him. But he couldn't allow that, he couldn't lose once more.

He vanished into thin air, sending a cold wave of fear down the lady's spine. All she could do was run, but she knew there was no escape. Sadly, she hadn't heard that to be consumed by the ghost, she had to look right into its eyes. So she ran faster than she ever had run before, determined to make it out to the city.

But she felt her legs freeze, the jolts of coldness jabbed at her body from each and every side, making her stop right in her tracks.

"LOOK INTO MY EYES DEAR, LOOK INTO THEM! JOIN YOUR OLD SHOEMAKER FRIEND! TOGETHER WE WILL BE SO STRONG" the ghost chanted once more, and thats when it struck her. She pulled out her pocket mirror, and held it close to her eyes before opening them. It worked, the ghost couldn't see her yet.

She ran as fast as she could once more, and tripped over a fallen log. The mirror flew out from her hands, and she raised her hands to cover her eyes.

"HOW ADORABLE LITTLE ONE....MIRRORS WON'T HELP. MY EYES WILL! THEY WILL SET YOU FREE! LOOK INTO MY EYES!" the ghost chanted yet again, holding a hint of the shoemaker's voice in its own.

The girl felt powerless, and screamed, "NO! PLEASE LET ME GO!"

The lady, being adamant, had compelled the ghost to once more use the trick of pretending to give up. It lightened its grip, and let the girl fall back onto the ground. She lay still, aware that the ghost was still there.

Not soon after, she had to open her eyes. Once again, the ghost's bloodshot red eyes pulled the girl's soul from her body, fused it in it's own, and the body fell once more, dead.

3. **The Last Witness**

The ghost sighed. It's revenge was over, it was time to return once and for all to the underworld for eternal rest. All of the witnesses were done. Something felt odd to the ghostly being....as if it were still being watched.

It looks around, scanning the entire maze of trees around itself, but no...there's nobody! It's confused, and trying hard to interpret what it is feeling. Someone was watching, and still is watching. It looks to the right, and shakes its head. It looks to the left, still nothing.

And then it looks in your direction, right through the paper.

"YOU! YOU'VE BEEN WATCHING MY EVERY MOVE! I CAN'T LET YOU GO NOW...COME, JOIN ME.

LOOK INTO MY EYES! LOOK INTO MY BEAUTIFUL EYES!"

You look away, rolling your eyes.

"It's just a story", you think to yourself, "this ghost can't do anything to me."

You look at some other text on the page, but your vision glitches for a second. You've missed it. You look back down and finally see it.

The ghost has carved out a message for you: I WILL FIND YOU

थोडं बोलू या

# वॉटस् अप नाते

-श्रेया तळपदे

सकाळ होताच फोन करतो बडबड, वॉटस्अप वर गुड मॉर्निंगच्या संदेशांची गडबड...

चहा झाला, नाश्ता झाला. सगळे कामावर गेले खाऊन. आता बघू वॉटस्अपवर कोणाला गुड मॉर्निंग करायचे गेले नाही ना राहून...

बारा वाजले. बघता-बघता कोणत्या ग्रुपवर कोण बोलतेय काय?

तेवढ्यात लक्षात आलं आपली कामवाली अजून आलीच नाय. लगेच फोन लावला तिला. आज येणार नव्हतीस तर कळवलं का नाहीस मला?

हिचाच मेसेज कसा मला नाही दिसला म्हणून पुन्हा फोनवर पाहिले पटपट. पण आता याचा काय उपयोग, कामाची आली ना डोक्याशी कटकट. माझंच चुकलं, उगीच लागले या वॉटस्अपच्या नादी.

फोन हातातच घेतला नसता कामे केली असती आधी.

सहजच सुचली कविता म्हणून लिहून काढली. वॉटस्अप हा आपल्या दैनंदिन जीवनाचाच भाग होऊन बसलाय. मला असं वाटतं या वॉटस्अपशी आपलं एक नातं जोडलं गेलंय आणि त्याच नात्याने आपल्या आसपासच्या इतर नात्यांना जोडून ठेवलंय. कामाच्या व्यापात वेळेअभावी आपण आपल्या नातेवाईकांना, मित्रमंडळींना वरचेवर भेटायला जाऊ शकत नाही म्हणूनच कदाचित स्मार्ट फोनच्या कृपेने आधुनिक युगाची गरज लक्षात घेता ही वॉटस्अप नावाची संस्था कार्यरत आहे असं म्हणायला हरकत नाही. आता तुमच्याशी बोलता-बोलता मला शेखर आठवला. 'शेखर' माझ्या माहेरी असलेला आमचा 'गडी'. तुम्हाला असं वाटेल हिची गाडी एका ट्रॅकवरून दुसऱ्या ट्रॅकवर भरकटली. पण असं नाहीए. वॉटस्अप नावाच्या ट्रॅकवरचीच ही शेखर नावाची गाडी.

हा शेखर माझ्या आईकडे वर्षोवर्षे काम करत असलेल्या आमच्या गणपतमामाचा मुलगा. लहानपणी गावी असायचा, पण अठरा-एकोणीस वर्षांचा झाल्यापासून गणपतमामाने त्याला इथे शहरात आणलं ते त्याच्या हाताशी मदतीला. शेखर आमच्यापेक्षा वयाने लहान म्हणून आम्हा दोन बहिणींना तो मोठी ताई आणि छोटी ताई असं संबोधायचा. आम्हालाही शेखरमध्ये लहान भाऊ मिळाला. मग काय आम्ही बहिणी या शेखरची मस्करी करायचो, खोड्या काढायचो त्यात आम्हाला या शेखरची लव्ह स्टोरी कळली. ती वॉट्सअपमुळे. शेखर कामात होता आणि तेव्हाच चक्क त्याला वॉटस्अप व्हिडिओ कॉल आला. तो मला आणि माझ्या बहिणीला दिसला. समोर साक्षी होती. आम्हाला त्याची लव्हस्टोरी सांगण्यावाचून त्याच्याकडे पर्यायच नव्हता. नव्हे आम्ही तसा पर्याय त्याला दिलाच नसता. मग काय झालं साक्षीच्या नावाने, आम्ही शेखरला येता-जाता चिडवायचो. शेखरलाही मनातून ते चिडवणं आवडायचं.

साक्षी ही त्यांच्या गावातल्या पाटलाची मुलगी. शेखरपेक्षा श्रीमंत. त्यामुळे शेखरने तिच्यावरचे प्रेम तिच्याकडे व्यक्त करण्याची हिंमतच केली नसती. ह्याची जाणीव साक्षीलाही असावी म्हणून तिनेच पुढाकार घेतला. शेखर गावी असताना रोजच त्यांच्या भेटीगाठी होत, पण शेखर मुंबईला आल्यापासून ह्यांच्या भेटीगाठींचे माध्यम एकच, वॉटसअप.

या वॉटस्अपमुळे महिनोंमहिने एकमेकांपासून दूर राहूनही एकमेकांच्या सहवासात राहू शकले हे 'प्रेमी युगुल'. यांच्यातलं प्रेम जपण्यात वॉटस्अपचा मोठा वाटा आहे. ही झाली शेखरची गोष्ट. पण अशी आणि यासारखी अनेक नाती कळत नकळत जपली जातात ती वॉटस्अपच्या कृपेने.

इतकंच कशाला, कोविडसारख्या माणसाला माणसापासून तोडणाऱ्या महाभयंकर संकटातसुद्धा माणसांना जोडून ठेवलं ते या वॉट्सअपने. मलाही इथे राहून त्या काळात आई-बाबांची खूप काळजी वाटायची. त्यांना भेटावंस वाटायचं त्यांना बघावसं वाटायचं पण मी तिथे जाऊ शकत नव्हते आणि तेही माझ्याकडे येऊ शकत नव्हते. तेव्हा रोज मी आईबाबांना वॉटस्अपवरून व्हिडिओ कॉल करायचे. दूधाची तहान ताकावर भागवायचे. पण हे ताक माझ्यासारख्या कितीतरी मुलींची तहान भागवत असेल हे नक्की. नाही नाही. नुसतीच प्रेमाची नाती जपत नाही. हा वॉट्सअप काही विलक्षण नाती ही वॉटस्अप बांधून ठेवते. बरं का आमच्या समोरचे जोशी काका कालच मला सांगत होते, त्यांच्या समस्त जोशी कुटुंबाचा वॉटस्अप ग्रुप आहे आणि त्याचं नाव 'जोशीले जोशी' या ग्रुपवर त्यातल्या कितीशा जोशींना एकमेकांशी बोलण्यात जोश असतो हे परमेश्वरालाच ठाऊक. हे तर काहीच नाही आमच्या बहिणाबाईंच्या पाच नणंदा आहेत. त्यांच्या वॉटस्अप ग्रुपचं नाव काय तर 'स्वीट सिस्टर्स' यातल्या

(पान ४ कॉलम ४ वर)

# आयुष्यातील गमती-जमती

-विनय त्रिलोकेकर

## आम्ही पाच भावंडे

मी घरातील शेंडेफळ. माझ्यावर चार बहिणी. पुष्पा, उषा, निशा आणि शिबानी (शुभा). आमची सर्वात मोठी बहीण पुष्पा. माझ्यात आणि तिच्यात दहा-बारा वर्षांचे अंतर. ती लहान वयातच आचार्य अत्रेंच्या 'मराठा'मध्ये नोकरी करू लागली. तारा रेड्डी, हमीद दलवाई, शैलाताई पेंडसे, इत्यादी लोकांचे येणेजाणे आमच्या घरी सुरू झाले. 'संयुक्त महाराष्ट्र' ची चळवळ चालू होती. चळवळ मोडण्यासाठी धरपकडीचे सत्र चालू होते. पुष्पाला पकडण्यात आले. आमची आई रडू लागली. अंबरमामाने तीस समजावले, ''अगं, चांगली गोष्ट आहे गं, अभिमानाची गोष्ट आहे.'' तुरुंगातून सुटल्यानंतर तिचा चाळीत सत्कार करण्यात आला. ह्या सर्वांचा अर्थ आणि महत्त्व त्यावेळी नीटसे समजले नसेलही.

अभिमान वाटणे वगैरे सर्व ठीक आहे. जगासाठी असेलही 'मोठी' लेखिका, पत्रकार पण कधीकधी वागायची एखाद्या लहान मुलाप्रमाणे. मला एक किस्सा आठवतो. आमची आई आपल्या मुलांच्याबाबतीत फारच possessive! आम्हा सर्वांची काळजी फार करायची. एकदा पुष्पा आणि माझी दुसरी बहीण, निशा लोणावळ्याला गेल्या होत्या. परत येताना त्यांना बराच उशीर झाला. रात्रही फार झाली. आई मला म्हणाली, ''त्यांना बघाला जाऊया?''

''त्या जीपने येत आहेत. त्यांना शोधण्यासाठी आपल्याला एक हेलिकॉप्टर हवे. तेव्हा फोन करून हेलिकॉप्टर मागवू का? आपल्याकडे फोन आहे कोठे?''

पण गंमत तर नंतर आली. घरी परतल्यावर आपल्याला उशीर कसा झाला ते सांगितले. जीपचा टायर पंक्चर कसा झाला, वगैरे, वगैरे. कशी धमाल केली ते सांगितले. सकाळी खाल्लेल्या चिकन-बिर्याणीची चव कशी जिभेवर राहिली आहे हेही सांगितले. पण आईचा राग काही शांत झाला नव्हता.

पुष्पा चुलीवरील भांडी उघडून पाहू लागली. ''हे काय, आई? आज सोमवार आहे, तुला माहीत नाही का? मला फराळाचे काही ठेवले नाहीस?''

''काय गं, सकाळी चिकन बिर्याणी आणि मटण चॉप खाऊन तुझा उपवास कसा काय?'' मी विचारले. मग आम्ही सगळे हसू लागलो. पुष्पाला 'शांत' असल्याचे सर्टिफिकेट आमचे एक चुलतकाका नेहमी देत. सुंदरकाका नवसारीला असत. अधून-मधून मुंबईला येत. घरी येत तेव्हा माझ्यासाठी काहीतरी आणीत.

पण मला सर्वात आवडत होत्या त्या फुलबाजीच्या कांडेपेट्या. काका पुष्पाला बटाट्याची भाजी बनवण्यास सांगत आणि तिने केलेली लालभडक भाजी त्यांना फार आवडे. तिने केलेले खाण्याचे प्रायोगिक पदार्थ आम्ही घाबरत घाबरतच खात. एकदा तिने चॉकोलेट केले, केवळ वाटीभर. निशा, शुभा, आई आणि मी (उषाचे लग्न झाले असावे त्यावेळी), साऱ्यांनी मिळून चाखले असेल जेमतेम पाव वाटी. 'आवडले नाही' असे तीस सांगितले. `To call a spade, a spade' ही आम्हाला मिळालेली शिकवण. ''काय वाईट आहे. का आवडले नाही?'' असे म्हणत पुष्पाने राहिलेली ३/४ वाटी संपविली. टी.व्ही.त पाहिले, 'आम्ही सारे खवय्ये'मध्ये असावे, तिने केलेले कारल्याचे आणि दुधी भोपळ्याचे आईसक्रीम. मी अजून तरी तिच्या हातचे हे पदार्थ खाल्ले नाहीत. पण माझ्या मामी आणि मामे भाऊ नृपाल सांगतात, 'खरोखर दोनही आईसक्रीम स्वादिष्ट होते आणि तिने केलेले जेवणदेखील.' तुम्ही म्हणाल, 'घरकी मुर्गी डाल बराबर.' पण म्हणतात ना, पाण्यात पडल्यावर...

उषाचे लग्न तसे लवकरच झाले. निशा सोडून आम्हा इतर भावंडांचे कामाचे वावडे. शुभा अधूनमधून काम करीतही असे पण ती पडली अति `SLOW' आणि त्यात ती पडली भ्रमिष्ठ. ती केरकचरा काढीत असे. पण तसे करीत असताना तिला वहीचे पान, जुने वर्तमानपत्र किंवा कोणताही लिहिलेला कागदाचा तुकडा सापडलाच तर कचऱ्याचे काही खरे नव्हते. तिच्या हातातील झाडू तसाच आणि तिचे डोके आणि डोळे मजकूर वाचण्यात गर्क. 'ए शुभा, हात हलवकी. तो कागद बाजूला ठेव.' पण आईच्या बोलण्याकडे तिचे लक्ष असायचे कोठे? ती आपली आपल्या वाचण्यात किंवा आपल्याच दुनियेत. आमच्या घरी पाहुण्यांची बरीच वर्दळ असायची. कोण पाहुणा आला की शुभा बेबीताईकडे पळायची, हातचे काम सोडून. ती तेथे ताईच्या गोष्टी ऐकण्यात रमायची. मलाही बेबीताईकडून गोष्ट ऐकण्यास मजा वाटायची. नवलाची गोष्ट म्हणजे ती इंग्रजी चित्रपट पाहून, ती गोष्ट उत्तम रित्या सांगे. चित्रपटातील नायक-नायिकांच्या नावासकट. 'रोमन हॉलिडे' जेव्हा मी प्रत्यक्ष पहिला तेव्हा ताईने केलेले वर्णन कसे हुबेहूब होते त्याची जाणीव झाली. तिला इंग्रजी समजत नव्हते मग ती चित्रपटातील गोष्ट सुंदर रित्या कशी काय सांगायची?

(क्रमशः

नवलCURRY

# वाडा जुना झाला म्हणून...

**सौ. मुकुला प्रदीप नवलकर**

सुट्टीची निवांत सकाळ. जराशी सुस्तावलेली... रोजच्या सवयीने चुलीवर चहासाठी पाणी चढवलं. यंत्रवत नाश्त्याची तयारी सुरू केली. आता या येवढ्याच जिनसा वापरून वेगळ्या चवीचे, दोन तीन पदार्थ बनवता येतील... कमाल ग बाई! एकम् सत्... विप्रा बहुधा वदन्ति. हं असो! आतामात्र पटकन् तयार होईल असं एकच काहीतरी मस्तचुस्त बनवावं म्हणून मी ओट्याकडे वळले. तेव्हाच, सकाळची शांतता भेदीत तार सप्तकातील पिपाणीचा स्वर वातावरणात भरू लागला. चढ्या आवाजात काही सवाल आणि जबाबी घुंगरांचा नाद, सोबत ढोलकीचं आवतणं, गुबु गुबु... गुबु गुबु... अय्या, नंदीबैल आलाय..! हातातलं काम टाकून मी खिडकीतून डोकावलं. अरे वा तोच थाट! पाठीवर रंगीत कापडी झूल, शिंगावर रंगबिरंगी गोंडे, गळ्यात घुंगुरमाळा, असा सजलेला नंदी. अंगरखा, धोतर, फेटा अशा वेषात सवाल करणारा त्याचा मालक आणि नंदीबैल आल्याची वर्दी देत धनुकलीने ढोलकीचे बोल काढणारा सोबतचा सहकारी. गुबु बुगु गुबु बुगु.

फारा वर्षांपूर्वी पहायचो तेच दृष्य... मन चाळीस... पन्नास वर्षे मागे गेले...!! तिमाही परीक्षा संपून दिवाळीची सुट्टी लागलेली. वाड्यातले बालगोपाळ कुण्या एखाद्या दादाच्या हाताखाली आकाश कंदील बनवत बसलेले आणि असा नंदीबैल यायचा. रंगबिरंगी कागद, कात्री, डिंक, पतंगांच्या काड्या असा सारा ऐवज तसाच सोडून सगळे वाड्याच्या मधल्या मोकळ्या जागेत गोळा व्हायचे. आयाबाया डोकावून जायच्या. पुरुषमंडळी गावाकडची, पीकपाण्याची चौकशी करायचे. नंदीचा मालक मग खुलायचा. एक एकाची नाव घेऊन सवाल विचारला जायचा, त्यावर नंदी मान हलवून असे उत्तर द्यायचा, की सारेच खूष व्हायचे. मग कोणा घरची आक्का पूजेचे ताट, पाण्याचा तांब्या, सुपात दाणा घेऊन यायची. नंदीच्या पायांवर पाणी घालत त्याची साग्रसंगीत पूजा व्हायची आणि त्याला खाऊ घातले जायचे. पै पैसा, कपडालत्ता, पसा पसा धान्य असे काही ना काही मालकालाही मिळायचे. मग समाधानाने, फेट्याचा शेव गळाभर फिरवून खांद्यावर उडवत तो म्हणायचा, दुनियेत नाव होऊ दे... लेकराबाळांना सुखी ठेव... त्याना आशीर्वाद दे असे म्हणतच तो पुढे आणि त्याच्या मागून नंदीही निघायचा... गुबु गुबु...

त्याकाळी दिवसभरात कोणी ना कोणी, वाड्यात हजेरी लावून जायचेच. भल्या सकाळी, घोळदार अंगरखा, धोतर,कमरेला उपरणे, त्यात खोचलेला पावा, मोरपिसांची उंच टोपी, हातात टाळ चिपळी, पायात घुंगरु आणि त्याच्या तालावर कृष्णगीत गात वासुदेव यायचा. गुरुवारी शुभ्रवस्त्रातील, श्रीगुरुदेवदत्त म्हणत, दत्त उपासक तर कधी हातात एकतारी आणि खांद्यावर पताका घेऊन, चंदन टिळ्यावर बुक्का लावलेला वारकरी, अभंग गात यायचा. कधी डोक्याला हिरवा रुमाल, काळीकफनी, चौकटीची लुंगी, एका हातात धुपदाणी, एका हातात मोरपिसांचा कुंचा असा दाढीवाला फकीर यायचा. जमुरे, खेल दिखा म्हणत मदारी. कधी बहुरुपी. पुंगीची गुंगी घालत नागोबा घेऊन गारुडी. तर अधूनमधून अस्वल घेऊन दरवेशी यायचा. बाल्यांसह गोमू आणि दशावतारी सोंग, अंबाबाईचे गोंधळी, खंडोबाचे वाघ्या मुरळी, पोतराजाबरोबर कडकलक्ष्मी आणि नाना खेळ दाखविणारे डोंबारी तर यायचेच यायचे. मग घराघरातून त्यांना एखाद दोन नाणी तर कधी सणावाराला गोडाधोडाचं वाढलं जायचं. बायाबापड्या आणि सोबतची चिल्लीपिल्ली, जुनेर नेसणी आणि जुने विटके कपडे मिळाले तरी खूष व्हायची. घेणारे लोभी नव्हते की देणाऱ्यांना ताठा नव्हता. जे आहे ते मिळून... वाटून घेण्यात आनंद होता.

वाड्यातील बिऱ्हाडं दहा दिशांची, बारा गावची. सालभर कुळधर्म, कुळाचार, सणवार, व्रतवैकल्ये चालूच असायचे. कुणाकडे गणपतीबाप्पा तर कुणाकडे गवर असायची. कुणाकडे अष्टमीचा बालकृष्ण तर कुणाकडे नवरात्रीचे घट बसायचे. चैत्रगौरीचे हळदीकुंकू, श्रावणातले सोवळे सोमवार.. शनिवार, मंगळागौर, सत्यनारायण सारे सणउत्सव, समस्त कुटुंबं शेजारासह साजरे करायचे. याशिवाय वर्षभर घराघरात, काही तरी विशेष असायचंच. कुणाकडे केळवण, कुणाकडे डोहाळं जेवण. कुणाकडे बारसं तर कुणाकडे मुंज. कुणाकडे जावई तर कुणाकडे सून यायची. दिवाळी, होळी आणि धुळवडीची धामधूम तर अख्ख्या वाड्यातच चालायची. अडीअडचणी, दुखलं खुपलं, आजारपण अशावेळीही वाड्यातील कुटुंब एकमेकांना आधार द्यायची. म्हणजे, या मंडळीत,नेहमीच गोडी गुलाबी असेल, असंच काही नव्हतं...! कधीमधी आपसात खडाजंगीही व्हायची. मग कोणीतरी अण्णा नाही तर तात्या मध्यस्थी करायचे आणि प्रकरणं मिटवली जायची. सकाळचे नळावरचे वाद, पाणी भरून होईस्तोवर संवादात बदललेले असायचे आणि दिवसभरात त्यांच्यात विरजण नाही तर साखरेचे साटेलोटेही चालायचे. पहाटेच्या काळोखात वाड्यातल्या एकूण एका झाडावरची फुले गोळा करुन देवाला वाहिली, की किशीची मावशी मागच्या अंगणात,जपमाळ ओढत ठिय्या मारुन असायची. तिथेच दुपारच्या वेळी वाड्यातील भगिनी मंडळाच्या निवांत गप्पाटप्पाही चालायच्या. धान्य निवडत शालुची आई लेकीच्या तालेवार सासरचं, वारेजंग कौतुक घोळवून सांगायची. त्यावर शेंगा फोडत मालुची आत्याबाई,आपल्या भावाचे सरकारी प्यादे, मोठ्या मुत्सद्दीपणे नाचवायची. विजीची आजी नारळ सोलत, तिच्या सासुरवासाची कहाणी, अगदी वरच्या पट्टीत, हावभावासहीत रंगवून सांगायची तेव्हा सुमीची मामी, काहीबाही पुटपुटत, खलबत्त्यातले जिन्नस अमंळ जोशात कुटत रहायची. एक उलट... एक सुलट टाका घालत शकुची काकू, जिन्यातली कुजबूज आणि गच्चीवरची गुपीतं साळसूदपणे चघळायची, वर शेजारणीला ढोसून, काय वैनी... खरं का नाय? अशी साक्ष काढायची. तेव्हा बिचारी वहिनी, सुपातली फोलपट पाखडताना... होय नाही... होय नाही, अशी मान हलवत रहायची. गुबु बुगु...

मोसमाप्रमाणे, गावाहून आंब्याच्या पाट्या अन् फणसाचे हारे, घरच्या भाताची पोती, नारळाच्या गोणी आणि पानात अलगद गुंडाळून सुरंगीचे वळेसर, आठवणीने पोहचते व्हायचे. कधीमधी गोठ्यातल्या नव आगमनाच्या वार्तेसह, धावत पळत चीक नाहीतर खरवस पोहचवला जायचा. रोजच कोणा ना कोणाकडे, पायली पायलीच्या हिशोबाने मधल्या वेळेचा खाऊ बनायचा आणि मदतनीसाच्या घरी, डबाभरून पोहचता व्हायचा. उन्हाळ्यात सार्वजनिकरित्या लोणची, सांडगे, पापड कुरडयांचा घाट घातला जायचा तेव्हा सट, बरण्या, रोवळी, मोरळी, टोपं पराती यांसह पोळपाट लाटणी परजून कामाचा फडशा पाडत. तमाम लेकीसुनांची, धमाल चज्जाम चणिआ चम्मतग चालायची.

दिवस असेच हसतखेळत, आनंदात निघून गेले...

तिथे गावच्या शेतजमिनीवर, शहरातील धनिकांचे बंगले जसे उभे राहिले तसे इथे शहरातील नांदते खेळकर वाडे जमीनदोस्त झाले. त्यांच्यासमवेत एक जागती संस्कृती, काळाच्या ओघात लयाला गेली. हे असे घडले... हे जरी खरे असले तरी, त्या वाडासंस्कृतीचे मवाळ संस्कार, जनामनात खोलवर रुजलेले होते. तेच आज मध्यमवर्गीय विचारसरणी म्हणून मनामनात शाबूत आहेत. कारण ती केवळ संस्कृती न राहता,सहवासाने बहरलेली एक वृत्ती बनली आहे आणि मध्यमवर्गीय तनामनात पुरती भिनली आहे. म्हणूनच,आजही बंद दाराच्या चौकटीतील त्रिकोणी कुटुंबात, ती वेळप्रसंगी डोकावत असते ... चंद्रशेखर गोखले यांच्या चार ओळी सांगायच्या तर... वाडा जुना झाला म्हणून, प्राजक्त जुना कसा होईल... आणि प्राजक्त जुना म्हटला, तर त्याला नवा बहर कसा येईल... काळ बदलला म्हणून झाडांनी बहरणे सोडले नाही. फुलांचे फुलणे हरपले नाही. पाखरांनी आपलं कूजन थांबवले नाही की पशुप्राणी आपला आब विसरले नाहीत. तसेच भोवतीच्या सृष्टीचाच एक सदस्य म्हणून निसर्गाची शिकवण अंगीकारत काळवेळेचे भान ठेवून कूस पालटत, मनामनात नांदणारी परंपरा, आपण माणूस म्हणून जागती ठेवली आहे. ना सुधारकी टिमकी, ना गत आयुष्याचा कढ !

उगवणारा प्रत्येक दिवस नव्या उत्साहात, नव्या उमेदीने पार पाडताना, निमित्त मात्र उत्सव अन् सणवार साजरे होतात तेव्हा आपल्या चिरंतन संस्कृतीचे, जिवंत दर्शन घडत असते.

आज आधुनिक जगात,नवीन परिमितीत सामावून जाताना, समाजातील प्रत्येक स्तरावरील व्यक्ती, माणूस म्हणून तर जगवली पाहिजेच पण त्यासोबतच लोककला, लोकवाङ्मय आणि लोकसंस्कृती जागती ठेवली पाहिजे. आपल्या कसदार मातीचा हा वसा,

असाच पिढ्यांनपिढ्या चालत रहावा आणि मानवी सभ्यतेच्या प्रगतीपथावर वेगाने पालट जाणाऱ्या जीवनशैलीचा स्वीकार सुसह्य व्हावा, यासाठी वाटेवर अशी हिरवळ आणि असे पाणवठे, असेच जपले जावेत... नव्हे, जाणीवपूर्वक राखले जावेत. गुबु गुबु गुबु गुबु....

अरेच्चा! नंदी परत निघालाही... पाण्यालाही आधण आलंय... आणि माझे मन? ते तर केव्हाचेच थिरकते आहे, गुबु बुगु बुगु बुगुच्या तालावर...!

*

---

(पान ३ कॉलम २ वरून)

सिस्टर्स स्वीट जाऊदे पण समोरासमोर आल्यावर बोलतही नाहीत मग या वॉटसअप ग्रुपवर काय बरं बोलत असतील हा अनुत्तरीत प्रश्न. असो. एकूण काय तर ही मानवी नाती जपणं, बांधण हे वॉटसअपने चांगल्या प्रकारे साधलंय.

तरीही आपल्या आयुष्यातील काही नाती ही वॉटस्अपवर नाही जगता येत. त्यांना प्रेमाचा, मायेचा ओलावा आणि सहवास या गोष्टींची नितांत गरज असते.

आता थांबते इथे. किती वेळ झालाय आतापर्यंत कितीतरी वॉटसअप आले असतील. बघून येते. आपण पुढच्या महिन्यात थोडं बोलू या. हो पण वॉटसअपवर नाही हां...

# TRAVELOGUE

**-Aadhar Kothare**

**<u>Gastronomic Tales</u>**

In this article, we will cover the local eateries of two of the most popular places for sumptuous and mouth-watering food – Indore and Amritsar

**Indore - Sarafa Bazaar**

Indore's famous Sarafa Bazaar is known for its amazing street food and great options it offers for shopping. Amazing Indian sweets like Rabdi, Gulab jamun, Jalebi and Basundi are available at every nook and corner. Butte ka kees is a specialty and the chaat here is also quite popular.In the day time, it is a jewellery market which usually opens up at around 11 AM and later after 8 PM the jewellery stores shut down and the street food vendors set up their stalls.Sarafa Bazar operates from 8pm till midnight.This place sells only vegetarian foods but there is a wide variety to choose from. We have chosen few of the must try eating joints/options for you in this article.

**Nagori Ki Shikanji** – This place is best known for its Shikanji which is a misnomer because its Shikanji is actually a milk product. It is thick, calorie-dense and very sweet.It's actually not a Shikanji, but it's like a semi-thick paste of peda (sweet). 1 glass is enough for 2 people (Currently Rs. 55/per glass). The kaju barfi here is to die for. It's perfectly sweet and tastes almost like having raw kaju.

**Hotel Rajhans Restaurant** – Located at 52, Bada Sarafa, the restaurant has only two items on the menu- Dal Bafla or Dal Bafla thali. The Bafla is soft and served with liberal dose of ghee. The dal accompanying it spicy with strong smell of hing. With thali you get gond ka laddoo, rajasthani karhi, fried rice and aloo ki subzi.

**Joshi Dahi BadaHouse** – Very popular food joint of Indore Sarafa Bazar. Famous for its Dahi Bada's and Bhutte Ka kees. They are also famous for serving the dish with typical acrobats, tossing the dahi bada filled bowl high in air, catching without looking up or without spilling over even a single drop. It's fun watching them serving in traditional style.The 4 or 5 masalas flow sequentially from his fingers at the same time. Magic. And the taste is heavenly.part from dahi bada it also have very tasty "bhutte ka kees", "kachori", "bhalle", "mirchi vada", "chaat", etc.

**Jai Bhole Jalebi Bhandar** –It is uniquely famous for succulent mega jalebis called **Jalebaas**, and also for delicious Maalpuaas. Each of the juicy & succulent jalebaa here would a minimum of 200 gm, but you can ask the chef to make a single jalebaa weighing much more - even 500 gm. The deliciously soft Maalpuaas are also great here. Both are definitely in the 'must-try' category.

**Vijay Chat House** – Lively, down-home outlet specializing in traditional sweet and savory fried and baked nibbles. Their 'Khopra Petis' has been the same for decades- fresh, Hot, and tasty. Khopra patties are fried mashed potato spherical balls with central filling of grated coconut mixed with a paste of green chilli & ginger, served with a tangy date chutney & green chutney. Kachoris were popular in old Indore, even before Samosas gained popularity in India.Matar Kachoris are crispy fried roundels of fine flour filled with a spicy mixture of green peas & served with lip smacking mint & coriander chutney.This shop is open during daytime as well. Other savoury dishes served here include -Samosa, Aloo Chaat, Pani Puri, a variety of Khaman (Surati, Amiri, Fried). Fried Khaman is another crowd pleasing item on the menu, which is prepared by frying the conventional Khaman Dhokla with awesome tamarind & green chutney. Apart from these tongue tickling items, they also make a variety of drynamkeens like Khatta Meetha mixture, Heeng flavoured peanuts, Daal moth, Laung sev, Lehsunsev, Kachori Sev, Makhana Sev, etc. If you have a sweet tooth , you may indulge your taste buds with a variety of Indian sweets like Rabdi, Gulab Jamun, Mawa Baati, kalakand, Shahi Shikanji, Indrani, Litchi Rasgulla, Fruit Rabdi, Kesar lassi, Makhanbada, Gujiya, Rabdi Rajbhog, Kesar katli, Boondi Laddoo, Sohanpapdi, etc. If you get exhausted walking in the market , you may stop here & choose among milkshakes, icecreams, icecream shakes, dry fruit shakes, fresh fruit juices or Lassi with ice cream. These are perfect drinks to beat the heat.

**<u>Amritsar</u>**

**Makhan Fish and Chicken Corner Amritsar (Since 1962)** – No "food places in Amritsar" list is complete without Makhan Fish & Chicken Corner. This place is synonymous with Fish Tikka in Amritsar and serves a variety of fish preparations – Fish Fried Sangara, Fish Fried Sohal, Fish Tandoori Sangara, Fish Tandoori Sohal, Fish Masala, Fish Chilli and Fish Tomato.The fish is sourced daily from local market and is fresh, tender and juicy, which is then grilled for hours in earthen tandoor. Before its grilled, fish is marinated in their special Amritsari masala for overnight. This gives the fish a very flavourful taste. The Fish Tandoori and Fish Masala will be my recommendation. Not just the tandoori preparation, the Fried Fish is equally delicious.Main Course include Butter Chicken, Karahi Chicken, Chicken Methi Malai, etc.

**Kesar Da Dhaba**– They serve an exclusive mouth-watering cuisine with the Traditional Punjabi flavor. They are immensely popular for Dal Fry, Chana Fry, Bharta, Saag Fry {seasonal}, Ajwain Butter Paratha, Missi Roti and Chopri Chapati and kinds of Thali. They have 5 kinds of Thali – Paratah Thali, Aloo Paratah Thali, Gobhi Paratah Thali, Chapati Thali and Chapati Chopri Thali. All of which are served with Dal Fry, Palak Paneer, Chana Fry and Raita. Everything is made using Desi Ghee, which adds the taste.

**Bharawan Da Dhaba** –Its located on the chowk near start of the golden temple pathway opposite the partition museum. It's a pure veg restaurant and serves traditional Punjabi dishes such as Sarso Da Saag, Makke Ki Roti, Yellow Dal, Amritsari Chur Chur, Naan,Paneer Lababdar, Dal Makhni, Boondi Raita, Amritsari Kulche, Kheer. Most guests recommend trying tasty kulfi, Gulab jamun and pudding. Good mangolassi, tea or coffee are waiting for you at *Bharawan Da Dhaba*.

**Mohan Singh Meat Shop** –This is a small eatery joint which sells only mutton items. An amazing place in Amritsar to eat mutton chaap, along with bheja curry and mutton curry. All the dishes are good but the chaap is just next level. Truly mouth-watering food. A lot of ghee goes into the preparation so if you are a diet conscious person.

# 162 E Dr. AMBEDKAR ROAD

**- Achala Subhash Desai**

This address is unique ! A ground plus three storied structure in the heart of Dadar . of National Integration and all the residents lived up to this idea. A Kashmiri family with tall fair members with chiseled features lived on the top floor or should I say North of the building ? A few families were originals ofGujarat and Kutch. All excelled in the art of trading of cloth or any other useful articles. The culture and wayof living in the rich Uttar Pradesh came here to stay. The art and its branches from the State of Karnataka adorned the structure midway. The workshop or studio was open to all. The Brahmin from western Maharashtra added to the intellect of the neighbouring residents.

The Jews with different hues of day to day life had their share in the diversity . The Tamil Brahminstood firm at the root level just like Chennai to the south of India . Not to miss the Jewel in the Crown of Pathare Prabhu family for disbursing knowledge in Science and Language. There was integrity in diversity. Alllived like a huge family sharing each other's joys and sorrows . A mixture of Hindi, Gujarati, Kutchi, Marathi, Kanada, Tamil and English added to the grandeur. To top it all, cuisines of different states reached one and allin this unique structur . Of course these are all memories now, but enjoyable to the core.

## वाचकांची प्रतिक्रिया

एप्रिलचा प्रभुतरुण आज पोहोचला.

दादा नावाचा समृद्ध ऋतू हे संपादकीय, माणसातील देवपण अधोरेखित करणारे अत्यंत हृदयस्पर्शी असे उतरले आहे.

आपले आयुष्य ऋतुचक्रातील वसंतापासून हेमंतापर्यंतचा अनुभव आपल्याला देतच असते.

तरी या प्रत्येक ऋतूत नात्यातील गोडवा जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने टिकवणारा सुहृदकर्ता पाठीशी असणे याला भाग्य लागतं.

त्यांना विनम्र आंदरांजली.

**- मुकुला राणे नवलकर**

## कृतज्ञता

प्रभुतरुणाच्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचा १६-४-२२ रोजी वाढदिवस साजरा झाला. त्यानिमित्ते सोशल समाजाच्या अध्यक्षा स्वाती राणे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच 'प्रभु प्रभात' मासिकातर्फे अध्यक्ष श्री. कुंदन आगासकर आणि संपादिका वृंदा जयकर यांचे शुभेच्छापत्र आले. श्री. उमेश कीर्तिकर, स्वाती जयकर आदींनीही खास शुभेच्छा दिल्या. सुहासिनी सुहास कोठारे यांनी या शुभेच्छांच्या दिवसाची सुरुवातच केली. या सर्वांविषयी आदर व स्नेहभाव मनात ठेवून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

## प्रतिक्रिया

प्रभुतरुण काल मिळाला. छान आहे. दादांबद्दलचा आपला कृतज्ञता दर्शविणारा लेख खरंच हृद्य आहे. आपल्यासाठी कोणी आयुष्यात काय केले आहे ह्याची जाणीव ठेवणे हे आपल्या सुबुद्धतेचे आणि मनाच्या परिपक्वतेचे परिमाण असते. आपल्या ह्या लेखाद्वारे आपण त्याचे यथार्थ दर्शन घडविले आहे. असे मोठे बंधु लाभणे हे खरोखरच भाग्याचे आणि त्यांच्या मायेची जाणीव ठेऊन त्यांच्याप्रति मोठ्या मनाने कृतज्ञता व्यक्त करणे खरंच मनाच्या मोठेपणाचे लक्षण! अप्रतिम लेखाबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन!!!

**-दिपक धैर्यवान**

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे


१२-४-२२ सौ. केतकी आणि श्री. तेजस प्रदीप राणे, पुत्र, पुणे

### नांदा सौख्यभरे

०९-४-२२ श्री. चैतन्य गौरांग श्रीकृष्ण कीर्तिकर, कु. हिमानी सत्विंदर अर्नेजा (आं. ज्ञा.)
१७-४-२२ कु. किनल नंदकिशोर कोठारे, श्री. प्रदीप एस्. शिंपी (आं.ज्ञा.)

### मरण

२७-३-२२ श्री. राजीव सूर्यकांत तळपदे वय ६३, राणेवाडी (अंधेरी)
०१-४-२२ श्री. सुबोध वसंत देसाई वय ९०, अंधेरी (पूर्व)



सत्यमेव जयते
प्रधान मंत्री
Prime Minister

New Delhi
माघ 08, शक संवत्, 1943
28th January, 2022

**Shri Sujan Rane Ji,**

It is a pleasure to receive your letter. Your warm and affectionate words have filled me with fresh energy to strive in the service of Maa Bharati.

Our nation is marching ahead with the collective resolve of 130 crore citizens to build a new, self-reliant India. Today, the 21st century India has the ability to dream big and realise as well.

As we celebrate Amrit Mahotsav of India's independence, the goal of the Amrit period is to ascend to new heights of prosperity for India and the citizens of India. It will contribute to a safe and prosperous world beyond our borders.

Your views and concern about the progress of the nation are appreciable. It is heartening to learn that your creative works adorn the walls of some of the leading institutions of our country.

May you continue to be blessed with good health in the years ahead.

Warm regards,

Yours

**(Narendra Modi)**

**Shri Sujan Rane**
149, Cranbury Neck Road
Cranbury, New Jersey
U.S.A - 08512

## प्रभुतरुणास देणगी

★ सौ. गीता श्री. आंबवणे यांजकडून कै. मंजुळा नारायण धराधर स्मरणार्थ प्रभुतरुणास देणगी रु. ५००/-

देणगीदारांस शुभेच्छा आणि मन:पूर्वक धन्यवाद.

## अभिनंदन

★ जोगेश्वरी देवी आणि जोगेश्वरी गुंफा यावर 'हेरिटेज'ने फार चांगला, विश्लेषणात्मक माहितीपट तयार केला. त्यात सदस्य म्हणून सॉलिसीटर राजन जयकर यांचे माहितीपर निवेदन आहे.

त्याचप्रमाणे १६ एप्रिल रोजी भारतीय रेल्वेला १७० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे महोत्सव साजरा झाला. तेथे निमंत्रित म्हणून ते उपस्थित होते.

★ मॅक्स्वेल लोपिस यांच्या मीरेवरील पुस्तकासाठी प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी पाठपृष्ठ लिहिले आहे. या पुस्तक प्रकाशनावेळी पुस्तक प्रकाशक श्री. अशोक कोठावळे यांनी कीर्तिकर यांचे भाष्य वाचून दाखवले.

'ललित' मासिकात त्यांचे 'लक्ष्यवेधी' हे सदर प्रसिद्ध झाले. तसेच वाचकांची निवडमध्ये त्यांची निवड प्रसिद्ध झाली.

महाराष्ट्र दिनी मुलुंड कॉलेजच्या माजी सहकाऱ्यांचे 'सहआनंद' हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाचे संपादन प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचे आहे. तसेच या पुस्तकाचे मुखपृष्ठ त्यांचे आहे. या पुस्तकात लेख, कविता आणि संपादकीय त्यांचे आहे.

★ मृदुला प्रभुराम जोशी यांचे 'अभिजन-भाग २' हे पुस्तक खाजगी वितरणासाठी प्रकाशित होत आहे. त्यात 'प्रभुतरुण' आणि प्रभुतरुणाच्या संपादिका यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

★ पंडित सुजन राणे यांनी आपल्या संग्रहातील ऐतिहासिक तैलचित्रे पुण्यातील चित्रपटसंस्थेला भेट दिली. त्याबद्दल त्यांचा बनारस विद्यापीठाने सत्कार केला आणि बनारस येथे त्यांचे शास्त्रीय गायन झाले... इत्यादी बातम्या गेल्या अंकात प्रसिद्ध झाल्याच. पण आता भारताचे पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदींनीही त्यांना न्यूजर्सीला पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले. हे पत्र बाजूलाच देत आहोत.

★ श्री. सुमीत एस. नवलकर यांचे डे ट्विस्टर हे पुस्तक प्रकाशित झाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

---

(पान २ कॉलम १ वरून)

प्रथम क्रमांक- सौ. जयमती जयपाल तळपदे, दुसरा क्रमांक- डॉ. अर्चना निहाल कोठारे, तृतीय क्रमांक- स्वप्ना विनित जयकर, सौ. मीना धराधर-आंबवणे. (उत्तेजनार्थ).

★ *हिंदी वक्तृत्व स्पर्धा (महिलांसाठी) फॅशन का जुनुन*

प्रथमक्रमांक- सौ. जयमती जयपाल तळपदे, दुसरा क्रमांक- डॉ. अर्चना निहाल कोठारे, तृतीय क्रमांक (विभागून) स्वप्ना विनित जयकर, व मीना धराधर-आंबवणे.

★ *कलात्मक पाककृती स्पर्धा. पपईवर केलेली कलात्मक कृती (घरून करून आणणे)*

प्रथमक्रमांक- डॉ. अर्चना निहाल कोठारे, दुसरा क्रमांक- अस्मिता सलिल नायक, तृतीय क्रमांक- पूजा मंदार कोठारे, मिनल हेमंत जयकर (उत्तेजनार्थ).

★ *रांगोळी स्पर्धा. पाठारे प्रभूंचा गुढीपाडवा (कलशगुढीआवश्यक)*

प्रथमक्रमांक- श्रुता आनंद तळपदे, दुसरा क्रमांक- विद्या विजय त्रिलोकेकर, मिनल विजय कोठारे, अस्मिता सलिल नायक व मिनल हेमंत जयकर (उत्तेजनार्थ )

स्पर्धेचे परीक्षक म्हणून विश्वस्त वृंदा जयकर, सौ. नीता सेंजित, तसेच सौ. मेघना राणे व सौ. माधुरी कीर्तिकर यानी कामगिरी बजावली. नंतर भगिनींना मार्गदर्शन व पुढीलवेळी घेण्याच्या खबरदारीचा आढावा घेतला. हळदीकुंकूच्यावेळी आलेल्या देणग्यांचे वाचन कार्यकारी सभासद सौ. निकिता राणे यांनी केले. समाजाच्या अध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी रेशीमगाठी या नवीन उपक्रमाबद्दल निकिता राणे यांनी केलेल्या चारोळ्या वाचून या उपक्रमाला प्रतिसाद मिळावा म्हणून विनंती केली.

हळदीकुंकवासाठी गजरे समाजाच्या अध्यक्षा साया नवलकर तसेच कार्यकारी सभासद छाया विजयकर यांच्याकडून देण्यात आले. बतासे, चणे, खमंग वाटलीडाळ तसेच थंडगार पन्ह्याचा आस्वाद घेतल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67